## **ठळक बातम्या**

- देशातल्या व्यावसायिक ग्राहकांना आजपासून गॅस पुरवठा सुरू, घरगुती ग्राहकांसाठी इंधनाचा तुटवडा नसल्याचं सरकारचा पुनरुच्चार

- घरगुती वापराच्या गॅस सिलिंडरच्या नोंदणीसाठी शहरी भागात २५, तर ग्रामीण भागात ४५ दिवसांचं अंतर ठेवणं बंधनकारक, रेशन दुकानांवर रॉकेलची विक्री सुरू

- शासकीय रुग्णालयातल्या रुग्णांना बाहेर औषधं आणायला लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचं राज्य सरकारचं आश्वासन

**आणि**

- दुध उत्पादक संस्थांचे सदस्य नसलेल्यांनाही लवकरात लवकर नोंदणी करण्याचे FSSAI चे निर्देश

**<><><><><><>**

देशातल्या व्यावसायिक ग्राहकांना आजपासून गॅस पुरवठा सुरू झाला आहे, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी आज लोकसभेत दिली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

## **व्हाइस कास्ट**

*(साठेबाजी तसंच काळाबाजार टाळण्यासाठी व्यावसायिक वापराच्या सिलिंडरवर सरकारनं निर्बंध लादले होते. आता राज्य सरकारनं दिलेल्या यादीनुसार व्यावसायिकांना सिलिंडर दिली जातील. सध्या मासिक सरासरी गरजेच्या २० टक्के गॅस पुरवठा केला जाईल अशी माहिती पेट्रोलियम मंत्र्यांनी दिली. किरकोळ ग्राहकांसाठी पेट्रोल, डिझेल, गॅस यांचा कुठलाही तुटवडा नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. घरगुती गॅस सिलिंडरची नोंदणी केल्यावर पूर्वीप्रमाणे सरासरी अडीच दिवसात सिलिंडर घरपोच दिले जाते. एकदा सिलिंडर घेतल्यावर पुढच्या सिलिंडरच्या नोंदणीसाठी शहरी भागात २५ दिवस तर ग्रामीण भागात ४५ दिवसांचं अंतर ठेवण्याचा नियम लागू केल्याची माहिती त्यांनी दिली. रुग्णालयं आणि शैक्षणिक संस्थांना अखंडित गॅस पुरवठा केला जात आहे, अशी माहिती पुरी यांनी दिली.*

*याशिवाय देशभरातल्या रेशन आणि किरकोळ विक्री सुरू असलेल्या दुकानांवर रॉकेल पुरवठा नियमित करण्यात आला आहे. त्यासाठी ४० हजार किलोलीटर अतिरिक्त रॉकेल वाटप करण्यात आल्याची माहिती पेट्रोलियम मंत्रालयानं दिली आहे.*

*हॉटेल आणि रेस्टॉरंटना बायोमास, आरडीएफ पेलेट्स तसंच केरोसीन किंवा कोळशाचा पर्यायी इंधन म्हणून १ महिन्यासाठी परवानगी द्यावी असा सल्ला पर्यावरण मंत्रालयाने राज्यांच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाला दिला आहे.*

*होर्मुझमधून येणाऱ्या तेलपुरवठ्यापेक्षा जास्त तेल पुरवठा देशाला इतर स्रोतांकडून केली जाते. त्यामुळे भारतात कच्च्या तेलाचा पुरवठा सुरळीत होत आहे. इतिहासातल्या सर्वात मोठ्या कच्च्या तेलाचा संकटाचा सामना देश करतो आहे. अफवा पसरवण्याची ही वेळ नसून अशा परिस्थितीचा सर्वांनी एकोप्यानं सामना करावा, असं आवाहन त्यांनी केलं. )*

**<><><><><><>**

घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत रहावा याकरता शासनाने उपाययोजना केल्या आहेत. सिलेंडर्सचा काळाबजार अथवा साठेबाजी होऊ नये याकरता जिल्हा प्रशासन सज्ज आहे. याविषयी आमच्या वार्ताहरानं पाठवलेल्या बातम्या ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून

## होल्ड व्हाइस कास्ट

*(बीड शहरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच्या तीन हॉटेलवर धाड टाकून घरगुती सिलेंडर जप्त केले आणि हॉटेल मालकावर गुन्हा दाखल केला. रत्नागिरीत जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा बैठक घेतली. जिल्ह्यात मागणीपेक्षा पुरवठा जास्त आहे, असं प्रशासनानं सांगितलं.*
*सिंधुदुर्ग प्रशासनानं तहसिलदारांच्या नेतृत्वाखाली भरारी दक्षता पथकांची स्थापना केली आहे.*
*गॅस सिलेंडर पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये असं आवाहन भंडाऱ्याच्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी केलं आहे.*
*यवतमाळमधे सिलेंडर वितरणाचा प्राधान्यक्रम ठरवण्यात आला असून साठेबाजांविरुद्ध कठोर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे.*
*गॅस सिलेंडरच्या तुटवड्याच्या मुद्द्यावरुन काँग्रेसने आज विविध ठिकाणी आंदोलन केलं. गॅस दरवाढ मागे घ्यावी अशी मागणीही आंदोलकांनी केली.  नागपूर, नांदेड, ठाणे इत्यादी ठिकाणी कार्यकर्त्यांनी आंदोलन केलं. )*

**<><><><><><>**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयांमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असून रुग्णांना बाहेरची औषधं लिहून दिल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल असं वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी विधान परिषदेत सांगितलं. प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य अमोल मिटकरी यांनी याविषयीचा प्रश्न उपस्थित केला होता. शासकीय महाविद्यालयांमध्ये औषध खरेदीसाठी मिळणाऱ्या निधीपैकी सुमारे ७० टक्के खरेदी वस्तू प्राधिकरणामार्फत केली जाते, तर उर्वरित ३० टक्के रक्कम संबंधित संस्थांकडून खर्च केली जाते. याशिवाय जिल्हा नियोजन समिती मधून प्राप्त होणाऱ्या निधीतूनही आवश्यक औषधांची खरेदी करण्यात येते, असंही मुश्रीफ यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

हवामान बदलाच्या दृष्टीने महाराष्ट्र हे देशातल्या सर्वाधिक संवेदनशील पाच राज्यांपैकी एक आहे. २०२५ हे वर्ष दशकभरातलं सर्वात उष्ण वर्ष ठरलं आहे, अशी माहिती राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज विधानपरिषदेत दिली. सदस्य सुनील शिंदे यांनी याविषयी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती.

हवामान बदल हा गंभीर, संवेदनशील आणि व्यापक प्रश्न असून त्याला तोंड देण्यासाठी राज्याच्या आराखडा तयार असल्याचं मुंडे म्हणाल्या.

**<><><><><><>**

जमिनीला लागून असलेल्या घरांचाच समावेश झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत असल्याने मुंबई शहरात झोपड्यांच्या वरच्या मजल्यावरल्या झोपडीधारकांना पात्र ठरवता येणार नाही, असं मंत्री शंभुराज देसाई यांनी स्पष्ट केलं. ते विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होते. पोटमाळा किंवा वरच्या मजल्यावर राहणाऱ्यांना योजनेचा लाभ देता येणार नाही असं देसाई यांनी सांगितलं. सुनील प्रभू यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

पोटमाळा किंवा वरच्या मजल्यावरल्या झोपडीधारकांना पात्र ठरवलं नाही तर मुंबई झोपडपट्टीमुक्त होणं अशक्य आहे, त्यामुळे कायद्यात बदल करून यांना पात्र ठरवण्यात यावं अशी मागणी अस्लम शेख यांनी केली. यावर मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल असं देसाई यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

अर्थसंकल्पातल्या अनुदानाच्या मागण्यांवर आज दुसऱ्या दिवशी विधानसभेत चर्चा झाली. यावेळी विविध विभागाशी संबंधित मागण्या सदस्यांनी केल्या. विरोधी पक्षाच्या आमदारांनी राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेवरून सरकारवर टीका केली.

राज्यात दरवर्षी गुन्ह्यांचं प्रमाण वाढत असून कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, अशी टीका नाना पटोले यांनी केली. खून, बलात्कार यासारखे गुन्हे राजरोस घडत असून राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे, असं ते म्हणाले. विजय वडेट्टीवार यांनीही, राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनल्याचं सांगत सरकारचा वचक नसल्याची टीका केली. पोलीस विभागात भ्रष्टाचार बोकाळल्याचा

आरोपही त्यांनी केला. सरकारनं कर्जमाफी जाहीर केली असली तरी त्यासाठी पात्रतेचे निकष काय आहेत हे सरकारनं स्पष्ट करावं, अशी मागणी वड्डेटीवार केली. धान खरेदीचा कोटा वाढवून देण्याची मागणीही त्यांनी केली. महेश लांडगे, दिलीप लांडे यांनी चर्चेत भाग घेतला.

<><><><><><>

देशातल्या सहकारी दुध उत्पादक संस्थांच्या सदस्य नसलेल्या सर्व दुग्धउपादकांनी लवकरात लवकर आवश्यक नोंदणी करण्याच्या आणि परवाना मिळवण्याच्या मार्गदर्शक सूचना FSSAI अर्थात अन्न सुरक्षा आणि मानके प्रधिकरणानं दिल्या आहेत. दूध आणि दूग्धजन्य पदार्थांचा व्यवसाय करणाऱ्या अनेकांकडे परवाना नसल्याचं आढळून आलं असून व्यवसाय सुरु करण्यासाआधीचच परवाना मिळवावा असंही सूचनेत म्हटलं आहे.

<><><><><><>

सोन्याचे दागिने तसंच सोन्यापासून बनवलेल्या वस्तुंना हॉलमार्क अनिवार्य करण्याच्या सहाव्या टप्प्यात सरकारने आणखी सात जिल्ह्यांचा समावेश केला आहे. यामध्ये राज्यातला बीडचा समावेश आहे.

<><><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ८२९ अंकांची घसरण झाली आणितो ७४ हजार ३४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २२८ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ६३९ अंकांवर बंद झाला.

<><><><><><>

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात आमदार रोहित पवार यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांची आज भेट घेतली. या भेटीत आपण गांधी यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि या अपघाताबद्दल मिळवलेली सर्व माहिती त्यांना दिली. अजित पवार यांच्या अपघाताविषयी लोकसभेत आवाज

उठवण्याची विनंती केल्याचं रोहित पवार यांनी आपल्या समाजमाध्यमावर म्हटलं आहे. तसंच, खासदार कनिमोळी यांच्याशीही आपली दिल्लीत भेट झाली असून त्यांनाही या अपघाताविषयी माहिती दिल्याचं रोहित पवार म्हणाले.

**<><><><><><>**

गेल्या २४ तासात कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात उल्लेखनीय, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी लक्षणीय वाढ झाली. राज्यात सर्वाधिक तापमान अकोला इथं ४१ अंश सेल्सिअस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

**//<><><><><><>//**